**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार, दिनांक ०५ एप्रिल २०२४**

**ठळक बातम्या**

1. **आरबीआयकडून पतधोरण जाहीर, सलग सातव्यांदा व्याजदर कायम.**
2. **लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची आज छाननी सुरू.**
3. **लोकसभा निवडणुकीसाठी कॉँग्रेसचा जाहीरनामा प्रसिद्ध - युवक, शेतकरी, महिला, आणि कामगार वर्गांसाठी विविध घोषणा.**
4. **मनपा आणि नागपूर विद्यापीठाच्या 'मिशन युवा व मिशन डिस्टिंक्शन' कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद.**

*****

द्वै मासिक पतधोरण

भारतीय रिझर्व्ह बँकेनं सलग सातव्यांदा रेपो दर साडे सहा टक्के ठेवला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या पतधोरण समितीच्या आढावा बैठकीत ही माहिती दिली. रेपो दरात कोणताही बदल केला नसल्यानं गृहकर्ज महाग होणार नाही. चलनफुगवटा दरातली स्थिरता आणि आर्थिक घडामोडी लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचं शक्तिकांत दास यांनी वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. रिझर्व्ह बँकेनं २०२४- २५ या आर्थिक वर्षासाठी सकल देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर सात टक्के तर किरकोळ महागाई दर साडे चार टक्के रहाण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. रिझर्व्ह बँकेनं फेब्रुवारी २०२३मध्ये रेपो दर साडे सहा टक्के केला होता.

दुसरा टप्पा/छाननी

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची छाननी आज झाली. या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची मुदत काल संपली. या टप्प्यात, १२ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या ८८ लोकसभा मतदारसंघात तसंच बाह्य मणिपूर लोकसभा मतदारसंघाच्या काही भागासाठी २६ एप्रिलला मतदान होणार आहे. या टप्प्यामध्ये केरळात २०, कर्नाटकात १४, राजस्थानात १३ जागा, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्रात प्रत्येकी आठ जागा, मध्य प्रदेशात सात जागा, आसाम आणि बिहारच्या प्रत्येकी पाच जागा, तर पश्चिम बंगाल आणि छत्तीसगडमधल्या प्रत्येकी तीन जागांसाठी मतदान होणार आहे. तसंच मणिपूर, त्रिपुरा आणि जम्मू-काश्मीरमधल्या प्रत्येकी एका जागेसाठीही मतदान होणार आहे. राज्यात बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या ८ लोकसभा मतदारसंघात या टप्प्यात मतदान होणार आहे. यासाठी कालअखेर एकंदर ३५२ उमेदवारांनी ४७७ अर्ज दाखल केले आहेत. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीत अकोला मतदारसंघासाठी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत २८

व्यक्तींकडून नामनिर्देशन पत्रे दाखल झाली. त्यानुसार छाननीअंती १७ व्यक्तींचे अर्ज स्वीकृत करण्यात आले आहेत. नियोजन भवनात अर्जदार किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या उपस्थितीत निवडणूक निर्णय अधिकारी अजित कुंभार यांच्यामार्फत अर्जांची छाननी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. दरम्यान, आताच हाती आलेल्या बातमीनुसार बुलढण्यातून शिवसेनेचे संजय गायकवाड आणि भाजपचे विजयराज शिंदे यांचे अर्ज पुरेशा कागदपत्रांच्या अभावी बाद करण्यात आले आहेत.

काँग्रेस जाहीरनामा

लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं आज जाहीरनामा प्रसिद्ध केला. न्यायपत्र या नावानं हा जाहीरनामा काढण्यात आला असून त्यात ५ न्याय आणि २५ गॅरंटीचा उल्लेख केला आहे. युवक, शेतकरी, महिला, आणि कामगार या वर्गांसाठी विविध घोषणा काँग्रेसनं यात केल्या आहेत. युवकांना रोजगार न मिळाल्यास वार्षिक १ लाख रुपये बेरोजगारी भत्ता, गरीब महिलांना वार्षिक १ लाख रुपये अर्थसहाय्य, शेतकऱ्यांना कर्जमाफी आणि हमीभाव, मनरेगामार्फत किमान ४०० रुपये दर रोज मजुरी, सामाजिक आणि आर्थिक समानतेसाठी जाति आधारित जनगणना, संवैधानिक संस्थांचं जतन, इत्यादी मुद्द्यांचा या जाहीरनाम्यात समावेश आहे. हा जाहीरनामा म्हणजे कोणा एका व्यक्तीनं दिलेली गॅरेंटी नसून १३९ वर्षांचा गौरवशाली इतिहास असलेल्या पक्षानं दिलेली आश्वासनं आहेत असं पक्षाध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी सांगितलं. माजी अध्यक्ष सोनिया गांधी, ज्येष्ठ नेते पी. चिदंबरम यांच्या उपस्थितीत नवी दिल्लीच्या पक्ष मुख्यालयात आज हा जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. या जाहीरनाम्याची मध्यवर्ती संकल्पना न्याय ही आहे. मागील १० वर्षांत प्रत्येक घटकाचा न्याय धोक्यात आला आहे, कमकुवत झाला आहे तर काही बाबतीत न्याय नाकारला गेला आहे. म्हणूनच काँग्रेस पक्षाने पाच न्याय व २५ गॅरंटी देत देशातील सर्व समाज घटकांना न्याय देण्याचा संकल्प असलेले ‘न्यायपत्र’ जाहीर केले आहे, असं महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटलं आहे. दरम्यान भाजपाचा जाहिरनामा आज प्रसिद्ध होणार आहे. केंद्रीयमंत्री आणि ज्येष्ठ नेते राजनाथ सिंह यांच्या नेतृत्वाखाली नेमलेली समिती हा जाहीरनामा तयार करत आहे.

मोदी सभा

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रात पहिल्या टप्प्यात होणाऱ्या लोकसभा निवडणुकीच्या प्रचारात उतरणार असून ८ एप्रिल रोजी ते चंद्रपूर-वणी-आर्णी लोकसभा मतदारसंघात सभा घेणार आहेत. या मतदार संघात महायुतीचे उमेदवार वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रचारासाठी ते येणार असून हि सभा चंद्रपूरात मोरवा विमानतळाजवळील पटांगणावर सोमवार दिनांक 8 एप्रिल रोजी सायंकाळी 4.00 वाजता आयोजित करण्यात आली आहे. यावेळी त्यांच्यासोबत

राज्याचे उप-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, यांच्यासह राज्यातील महायुतीच्या घटक पक्षाचे प्रमुख नेते मंडळी उपस्थित असणार आहे.

अमित शहा

भंडारा-गोंदिया लोकसभा मतदारसंघात महायुती उमेदवारांच्या प्रचाराकरीता उद्या गोंदिया इथं आयोजित भाजपचे ज्येष्ठ नेते केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची होणारी जाहीर सभा पुढे ढकलण्यात आली आहे. अमित शाह यांची प्रकृती बरी नसल्यानं ते प्रवास करू शकत नाही त्यामुळे ही सभा रद्द करण्यात आल्याची माहिती महाराष्ट्र भाजप प्रदेश प्रवक्ता विश्वास पाठक यांनी दिली.

नितीन गडकरी

दळणवळण मंत्री म्हणून गडचिरोली जिल्हयात सर्वाधित ६०३ किलोमीटरचे राष्ट्रीय महामार्ग तयार केले. चांगले रस्ते झाल्यामुळे इथं उद्योग सुरु होत आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगाराची संधी मिळणार असून, येत्या दहा वर्षांत गडचिरोली जिल्हा हा राज्यातील सर्वात श्रीमंत जिल्हा असेल, असा विश्वास भाजपचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय दळणवळण मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला. गडचिरोली-चिमूर लोकसभा क्षेत्राचे भाजपचे उमेदवार अशोक नेते यांच्या प्रचारार्थ आज देसाईगंज आणि चामोर्शी इथं प्रचार सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत गडकरी यांनी गडचिरोली जिल्हयातील विकासकामांबद्दल माहिती दिली.

अरुण गवळी

मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठानं आज, गुंड अरुण गवळीची मुदतपूर्व सुटका करण्याचे आदेश दिले. नागपूर खंडपीठानं कारागृह व्यवस्थापनाला याप्रकरणी उत्तर देण्यासाठी ४ आठवड्यांची मुदत दिली आहे. मुंबई शिवसेनेचे नगरसेवक कमलाकर जामसांडेकर यांच्या हत्येप्रकरणी अरुण गवळीला दोन जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली होती. अरुण गवळीने उच्च न्यायालयात याचिका दाखल करून 2006 च्या शासन निर्णयाच्या आधारे शिक्षेतून सूट मागितली होती. महाराष्ट्र सरकारनं 2006 मध्ये जारी केलेल्या परिपत्रकानुसार शिक्षा झालेल्या कैद्यांनं वयाची 65 वर्षे पूर्ण केली असतील आणि जर कैदी शारीरिकदृष्ट्या कमकुवत आणि वृद्ध असेल, तर त्याची शिक्षा पूर्ण होण्यापूर्वी त्याची सुटका करण्याचा विचार केला जाऊ शकतो. अरुण गवळीचे वय 69 वर्षे असून हत्येच्या आरोपाखाली तो 16 वर्षांपासून तुरुंगात आहे. अरुण गवळी यांच्या बाबतीत 2006 च्या शासन परिपत्रकातील दोन्ही अटी पूर्ण होत आहेत. यामुळे उच्च न्यायालयाने गवळीची सुटका करण्याचा निर्णय घेतला आहे.

लोकनिर्णय महाराष्ट्राचा

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

न्यायालय

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डॉ.धनंजय चंद्रचूड यांच्या उपस्थितीत हायकोर्ट बार असोसिएशन नागपूरच्या शताब्दी वर्षाचं उद्घाटन आज उच्च न्यायालय परिसरात सायंकाळी 6 वाजता होणार आहे. त्याचप्रमाणे ७ एप्रिल पर्यंत विविध कार्यक्रमांचं आयोजन देखील करण्यात आलं आहे.

निवडणूक आयोग बैठक

मतदानात मतदारांचा सहभाग वाढवण्यासाठी ग्रामीण आणि शहरी भागासाठी वेगवेगळा कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिले आहेत. मतदानाचं प्रमाण अत्यल्प असलेल्या भागातल्या महापालिका आयुक्त आणि जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांची बैठक त्यांनी आज नवी दिल्लीत घेतली. या बैठकीमध्ये राज्यातल्या मुंबई, नागपूर, पुणे, ठाणे, पालिकांचे आयुक्त सहभागी झाले.

‘जागर मतदानाचा सहभाग युवांचा’

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ करिता भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांन्वये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ व नागपूर महापालिका यांच्या संयुक्त विद्यमाने 'मिशन युवा व मिशन डिस्टिंक्शन' अंतर्गत नव मतदार आणि मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या हेतूनं जनजागृती प्रचार-प्रसार कार्यक्रम आज कविवर्य सुरेश भट सभागृह इथं घेण्यात आला. नागपूर मतदानात डिस्टिंक्शनने पास होणार असा निर्धार युवा मतदारांनी 'मिशन युवा व मिशन डिस्टिंक्शन' या जनजागृती कार्यक्रमात व्यक्त केला.

‘केक पार्टी’

पहिल्यांदाच मतदान करणाऱ्या युवकांसाठी शेफ विष्णू मनोहर यांच्याद्वारे रविवार दिनांक ७ एप्रिल रोजी ‘केक पार्टीचं आयोजन करण्यात आलं आहे. मतदार जनजागृती मोहिमेअंतर्गत दुपारी 4 ते 7 वाजेदरम्यान इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियर्स, धरमपेठ इथं 15x5 फूट आकाराचा सर्वात मोठा केक ते तयार करतील.

लोकशाहीचा उत्सव

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, बुलडाणा जिल्ह्यात, प्रत्येक नागरिकानं मतदानाचा हक्क बजावून, लोकशाहीचा उत्सव साजरा करावा, असं आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केलं आहे. आगामी निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढावा यासाठी, आज जिल्ह्यातल्या ग्रामीण आणि शहरी भागात मतदार जागृती फेरी काढण्यात आली.

टेली मानस हेल्प लाईन

विद्यापीठ अनुदान आयोगाने सर्व उच्च शैक्षणिक संस्थांना टोल-फ्री मानसिक हेल्पलाइनच्या उपलब्धतेबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

हवामान

उद्या यवतमाळ आणि अमरावती इथं उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. तर पूर्व विदर्भातील भंडारा, गोंदिया, नागपूर, वर्धा, चंद्रपूर आणि गडचिरोलीसाठी उद्या आणि परवा वादळी पावसाचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर उद्यासाठी यवतमाळ आणि वाशीममध्ये सतर्कतेचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान गेल्या २४ तासात विदर्भात सर्वाधिक कमाल तापमान चंद्रपूर इथं ४२ पूर्णांक ६ दशांश अंश सेल्सियस इतकं नोंदविण्यात आलं तर नागपुरात ४१ पूर्णांक २ दशांश अंश सेल्सियस इतकं तापमान नोंदविण्यात आलं.

शिष्यवृत्ती अर्ज मुदतवाढ

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातर्फे प्रत्येक वर्षी अनुसूचित जाती प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना भारत सरकार शिष्यवृत्ती आणि राज्य शासनाची शिक्षण फी, परीक्षा फी योजनांचा लाभ देण्यात येतो. या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी पोर्टलवरुन ऑनलाईन अर्ज भरण आवश्यक आहे.

*****